विकसित महाराष्ट्र-२०४७ उपक्रमांतर्गत कार्यवाहीचा आढावा घेण्यासाठी राज्यस्तरीय सुकाणू समिती गठित करण्याबाबत

महाराष्ट्र शासन

कृषी विभाग

शासन निर्णय क्रमांक संकीर्ण- २०२६/प्र.क्र.७५/२अे (इ-१७५२५७३)

हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई - ४०००३२

दिनांक : २१ जुलै, २०२६

प्रस्तावना-

केंद्र शासनाकडून स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त भारताला सन २०४७ पर्यंत विकसित भारत-२०४७ करण्याचा संकल्प केला असून या राष्ट्रीय मोहिमेचा भाग म्हणून महाराष्ट्र राज्याची अर्थव्यवस्था सन २०२७ पर्यंत १ ट्रिलियन डॉलर्सपर्यंत व सन २०४७ पर्यंत ३.५ ट्रिलियन डॉलर्सपर्यंत पोहोचविणे हे मुख्य ध्येय ठेवले आहे. राज्याच्या ध्येयाची पूर्तता करण्याच्या दृष्टीने तसेच प्रत्येक क्षेत्राचा ठसा राज्याच्या अर्थव्यवस्थेवर उमटावा यासाठी शासनाने विकसित महाराष्ट्र २०४७ चे व्हिजन जाहिर केलेले आहे. सदर उपक्रमाची प्रभावी अंमलबजावणी, विभागांमधील समन्वय, धोरणात्मक मार्गदर्शन तसेच नियमित आढावा घेण्यासाठी राज्यस्तरावर "राज्यस्तरीय सुकाणू समिती" गठीत करण्याची बाब शासनाच्या विचारधीन होती.

शासन निर्णय-

विकसित महाराष्ट्र-२०४७ उपक्रमांतर्गत कार्यवाहीचा आढावा घेण्यासाठी खालीलप्रमाणे राज्यस्तरीय नियामकसुकाणू समिती गठित करण्यात येत आहे-

अ.क्र.	पदनाम	पदनाम
१	**अ.मु.स./प्र.स./सचिव, (कृषि)**	**अध्यक्ष**
२	आयुक्त (कृषि)	सदस्य
३	प्रकल्प संचालक, मा. बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्प	सदस्य

४	प्रकल्प संचालक, नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प	सदस्य
५	उप/सह सचिव (सहकार), सहकार व पणन विभाग, मंत्रालय, मुंबई	सदस्य
६	उप/सह सचिव (पणन), सहकार व पणन विभाग, मंत्रालय, मुंबई	सदस्य
७	उप/सह सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई	सदस्य
८	उप/सह सचिव, मृद व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई	सदस्य
९	उप/सह सचिव, उद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई	सदस्य
१०	उप/सह सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई	सदस्य
११	उप/सह सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई	सदस्य
१२	व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ, पुणे	सदस्य
१३	मुख्य कार्यकारी अधिकारी, कृत्रिम बुद्धीमत्ता व ॲग्री-टेक नवोपक्रम केंद्र, मुंबई.	सदस्य
१४	संचालक, महाराष्ट्र सुदूर संवेदन उपयोजना केंद्र, नागपूर	सदस्य
१५	राज्यातील सर्व कृषि विद्यापीठांचे संचालक (संशोधन)	सदस्य
१६	कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे.	सदस्य
१७	संचालक (सर्व), कृषि आयुक्तालय, पुणे	सदस्य
१८	सह/उप सचिव (२अे), कृषि विभाग.	**सदस्य सचिव**

२.समितीची कार्यकक्षा -

१. विकसित महाराष्ट्र २०४७ चे व्हिजन या उपक्रमाचा कृषि व संलग्न क्षेत्रासाठीचा कृती आराखडा तयार करुन त्यास मंजूरी देणे.

२. सदर कृती आराखड्याच्या अंमलबजावणीचे संनियंत्रण करणे.

३. विकसित महाराष्ट्र - २०४७ उपक्रमामध्ये समाविष्ट इतर उपक्रमांच्या प्रगतीबाबत तसेच कृती
आराखड्याच्या ध्येयपूर्तीचा निश्चित केलेला लक्ष्यांक साध्य करणेबाबत आढावा घेणे.

४. कृति आराखडा विकसित करताना वृद्धी होईल या दृष्टीने नियोजन करणे.

५. कृति आराखडा तयार करताना पर्याप्त निधी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने सर्व केंद्र व राज्य पुरस्कृत योजनांचे अभिसरण केले असल्याची खातरजमा करणे.
६. निवड केलेल्या पिक समूहांमधील प्रस्तावित मूल्य साखळी प्रगतीचा नियमित आढावा घेणे.
७. सन २०२९ पर्यंत ५-६ पिकांकरिता तसेच सन २०३५ पर्यंत एकूण १०-१५ पिकांकरीता विकसित करावयाच्या एकात्मिक मूल्य साखळी विकसनाबाबत करावयाच्या कार्यवाहीची तसेच अंमलबजावणीची सविस्तर कार्यपद्धती निश्चित करणे.

सदर समितीची दर महिन्याला बैठक पार पडेल.

३. वरील विवरणपत्रामध्ये संबंधित मंत्रालयीन विभागांनी त्यांच्या अधिका-यांचे नामनिर्देशन करावे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासन www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०७२११४३८४९८४४६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SUHAS MADHUSUDAN SAKPAL

Digitally signed by SUHAS MADHUSUDAN SAKPAL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=AGRICULTURE AND ADF DEPARTMENT, 2.5.4.20=01592dd98f36fbc924826517361a31b8166fce7745d35b95fa79159b8fb74478, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=82434617B1F4C6035B3CC29788B8D394A52FB3EDABFC26B4E85EBC2AF7C45FF9, cn=SUHAS MADHUSUDAN SAKPAL
Date: 2026.07.21 14:40:27 +05'30'

(सुहास सकपाळ)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत-

१) मा.मंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव
२) मा.राज्यमंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव
३) अपर मुख्य सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग,
४) अ.मु.स./प्र.स./सचिव, सहकार व पणन, मंत्रालय, मुंबई.
५) अ.मु.स./प्र.स./सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
६) अ.मु.स./प्र.स./सचिव, मृद व जलसंधारण, मंत्रालय, मुंबई.
७) अ.मु.स./प्र.स./सचिव, उद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
८) अ.मु.स./प्र.स./सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
९) अ.मु.स./प्र.स./सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०) आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे
११) प्रकल्प संचालक, नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प, मुंबई

१२) प्रकल्प संचालक, मा. बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्प, पुणे.
१३) अ.मु.स./प्र.स./सचिव, सहकार व पणन विभाग यांनी नामनिर्देशित केलेले उपसचिव
१४) अ.मु.स./प्र.स./सचिव, जलसंपदा विभाग यांनी नामनिर्देशित केलेले उपसचिव
१५) अ.मु.स./प्र.स./सचिव, मृद व जलसंधारण विभाग यांनी नामनिर्देशित केलेले उपसचिव
१६) अ.मु.स./प्र.स./सचिव, उद्योग विभाग यांनी नामनिर्देशित केलेले उपसचिव
१७) अ.मु.स./प्र.स./सचिव, ग्रामविकास विभाग यांनी नामनिर्देशित केलेले उपसचिव
१८) अ.मु.स./प्र.स./सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण यांनी नामनिर्देशित केलेले उपसचिव
१९) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ, पुणे
२०) मुख्य कार्यकारी अधिकारी, कृत्रिम बुद्धीमत्ता व ॲग्री-टेक नवोपक्रम केंद्र, मुंबई.
२१) महासंचालक, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद.
२२) संचालक, महाराष्ट्र सुदूर संवेदन उपयोजना केंद्र, नागपूर
२३) कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे.
२४) संचालक, राष्ट्रीय फलोत्पादन मंडळ.
२५) संचालक, अपेडा, मुंबई.
२६) संचालक (सर्व), कृषि आयुक्तालय.
२७) उप सचिव (सर्व), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
२८) सह/उप सचिव (२अे), कृषि विभाग, मंत्रालय, मुंबई.
२९) निवड नस्ती.